परिपत्रक : 2



**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 18**
**फ प्रभाग समिती**
**सभावृत्तांत ( कार्यपत्रिका क्रमांक 03 )**

**दिनांक : 04/02/2021** **वेळ : सकाळी 11.30 वा.**

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रीय कार्यालयाची मासिक सभा गुरुवार दि.04/02/2021 रोजी सकाळी 11.30 वाजता फ क्षेत्रीय कार्यालयातील " **राजर्षी शाहू महाराज सभागृह** " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. कुंदन अंबादास गायकवाड | सभापती |
| 2. | मा.स्वीनल कपिल म्हेत्रे | सदस्य |
| 3. | मा.साधना अंकुश मळेकर | सदस्य |
| 4. | मा. अश्विनी भिमा बोबडे | सदस्या |
| 5. | मा.योगिता ज्ञानेश्वर नागरगोजे | सदस्या |
| 6. | मा.संजय बबन नेवाळे | सदस्य |
| 7. | मा.भालेकर प्रवीण महादेव | सदस्य |
| 8. | मा.पौर्णिमा रविंद्र(आप्पा) सोनवणे | सदस्य |
| 9. | मा.संगिता(नानी) प्रभाकर ताम्हाणे | सदस्या |
| 10. | मा. पंकज दत्तात्रय भालेकर | सदस्य |
| 11. | मा. घोलप कमल अनिल | सदस्या |
| 12. | मा.उत्तम प्रकाश केंदळे | सदस्य |
| 13. | मा.चिखले सचिन तुकाराम | सदस्य |
| 14. | मा.दिनेश लालचंद यादव | स्वीकृत सदस्य |
| 15. | मा.संतोष भाऊसाहेब मोरे | स्वीकृत सदस्य |

याशिवाय मा.श्री.सिताराम बहुरे-प्र. क्षेत्रीय अधिकारी, श्री.विजयकुमार काळे –मा. कार्यकारी अभियंता-(स्थापत्य), श्री.सतिश वाघमारे-उपअभियंता (स्थापत्य),श्री शिंदे हनुमंत-उपअभियंता (स्थापत्य), श्री क्षिरसागर आर.व्ही.-उपअभियंता (स्थापत्य),श्री शहाजी गायकवाड–उपअभियंता(पाणी पुरवठा), श्री मोहन खोंद्रे - उपअभियंता (झोनिपु स्थापत्य), श्री सुनिल शिंदे –उपअभियंता(नगररचना), श्री शिवाजी लोखंडे–लेखाधिकारी, श्री भोईर ए.एन.-कनिष्ठ अभियंता(जलनि:स्सारण), श्री चव्हाण अश्लेश अविनाश-क. अभियंता (जलनि:स्सारण) , श्री डी जी कांबळे-उद्यान सहाय्यक, श्री एस.जी.घोडे-उद्यान सहाय्यक, श्री कोटीयाना .डी.एम.-आरोग्य निरिक्षक (पशुवैद्य.) इ. अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते.

मा. सभापती, कुंदन अंबादास गायकवाड यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करुन सभेची सुरुवात करणेस अनुमती दिली.

(कृ.मा.प.)

Scanned with CamScanner

मा.सभापती व उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालीलप्रमाणे ऐनवेळचे विषय सभेत दाखल करुन घेणेत आले.

विषय क्रमांक १-सन्मा.सदस्य् सचिन तुकाराम चिखले यांचा दिनांक ४/२/२०२१ रोजीची प्रस्ताव. प्रभाग क्रमांक 13 मधील से.नं. 22 याठिकाणी मिलींदनगर भागातील पडीक असलेली व मोडकळीस आलेली विद्युत विभागाची रुम जागा निगडी पोलीस ठाणे अंतर्गत पोलीस मदत केंद्र म्हणून कायमस्वरुपी निगडी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात यावी व या ठिकाणी पोलीस केंद्र म्हणून कायमस्वरुपी चालविण्यात यावे. या भागातील गुन्हेगारी व महिलांवर होणारे अत्याचारास मोठ्याप्रमाणात आळा बसेल यामुळे आम्ही हा निर्णय घेत आहोत तो सर्वानुमते मान्य देणेबाबत.

विषय क्रमांक २- सन्मा.सदस्य् प्रा.उत्तम प्रकाश केंदळे यांचा दिनांक ४/२/२०२१ रोजीचा प्रस्ताव. फ प्रभाग समिती सदस्यांचा अभ्यास दौरा माहे मार्च २०२१ मध्ये आयोजित करणेबाबत.

वरीलप्रमाणे ऐनवेळचे विषय दाखल करुन घेणेत आले.

---

विषय क्रमांक-१
दिनांक-०४/०२/२०२१
सूचक-सचिन चिखले

ठराव क्रमांक-२
विभाग- भुमि आणि जिंदगी
अनुमोदक-कमलताई घोलप

संदर्भ- सन्मा.सदस्य सचिन तुकाराम चिखले यांचा दिनांक ४/२/२०२१ रोजीची प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक 13 मधील से.नं. 22 या ठिकाणी मिलींदनगर भागातील गुन्हेगारी व महिलांवर होणारे अत्याचारास मोठ्या माणात आळा बसावा यासाठी से.नं.२२ येथील पडीक असलेली व मोडकळीस आलेली विद्युत विभागाची रुम जागा निगडी पोलीस ठाणे अंतर्गत पोलीस मदत केंद्र म्हणून कायमस्वरुपी निगडी पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्याचे प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा विषय सर्वानुमते मान्य् झाला.

---

विषय क्रमांक-२
दिनांक-०४/०२/२०२१
सूचक-प्रा.उत्तम केंदळे

ठराव क्रमांक-३
विभाग- प्रशासन विभाग, फ.क्षे.का.
अनुमोदक-संजय नेवाळे

संदर्भ- सन्मा.सदस्य प्रा.उत्तम केंदळे यांचा दिनांक ४/२/२०२१ रोजीची प्रस्ताव.

स्वच्छता अभियान अंतर्गत फ प्रभाग समिती सदस्यांचा दौरा माहे मार्च २०२१ मध्ये आयोजित करावयाचा आहे. सदरचे दौ-यामध्ये शहर स्वच्छता, कचरा विल्हेवाट, घनकचरा व्यवस्थापन तसेच इतर प्रकल्प् पाहणी, पर्यटन स्थळे पाहणी इ.बाबत जम्मू आणि कश्मिर राज्यातील महत्वाच्या शहरांना भेटी दयावयाच्या असल्याने सदर दौ-यासाठी फ प्रभाग समिती सदस्य् व ४ अधिकारी/ कर्मचारी यांचेसाठी येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेत येत आहे.

सदरचा विषय सर्वानुमते मान्य झाला.

---

Scanned with CamScanner

तद्नंतर मा. कुंदन अंबादास गायकवाड, सभापती यांनी सर्व उपस्थित सन्मा. सदस्य, पदाधिकारी / अधिकारी यांचे आभार मानून प्रस्तुतची सभा संपल्याचे जाहीर केले.

K.A. Gaikwad

(कुंदन अंबादास गायकवाड)
सभापती
फ प्रभाग समिती
निगडी- 44

क्रमांक- फक्षेका/सभा/कावि/15/2021 दिनांक- 09/02/2021

(सिताराम बहुरे)
प्रशासन अधिकारी
तथा सचिव, सभा शाखा
फ प्रभाग समिती,
निगडी-44

प्रति,
सर्व संबंधित ------------------------

Scanned with CamScanner